जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १४३ दिनांक - २७/०२/२०२४**

शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

**पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्याचे कारणावरुन मारहाण करणा-या आरोपीना ४ तासात केले जेरबंद**

दिनांक २६/०२/२०२४ रोजी रात्री शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीत भारत पेट्रोल पंप,मनपाजवळ, पेट्रोल पंपावर दरोडा पडल्याची बातमी प्रसारीत होताच शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे वपोनि चंद्रशेखर सांवत यांचे नेतृत्वाखालील टिमला तात्काळ गुन्हेगारांना पकडण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर पेट्रोल पंपाचे मालक यांना बांबुने डोक्यावर मारहाण झाल्याने त्यांना तात्काळ वैदयकीय उपचार केल्या नंतर त्याचे पेट्रोल पंपावरील कामगार फिर्यादी यांची तक्रार नोंद करीत असताना तांञिक तपास व मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे तीन अनोळखी आरोपींचा शोध घेतला असता पुढील आरोपी मिळून आले .

दाखल गुन्ह्यातील आरोपी नामे **१. सुरजितसिंग युवराजसिंग जुनी वय-२४ वर्षे, रा.पाटील इस्टेट, पुणे, २. जयसिंग जलसिंग जुनी वय-१९ वर्षे,रा.पाटील इस्टेट, पुणे,** ३ एक विधीसंघर्षित बालक यांना गुन्ह्यातील मोटार सायकलसह ताब्यात घेवून चौकशी केली असता. पंपावर पेट्रोल भरण्याचे कारणावरुन मारहाण केल्याचे उघड झाले. त्याप्रमाणे फिर्यादीचे तक्रारीवरुन शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.र.क्र.५२/२०२४ भादवि कलम ४५२,३२४,४२७,३४ सह मो.वा.का.कलम १२८ (१), १९४ (सी) ३(१)/१८१ अन्वये गुन्हा नोंद करुन नमुद आरोपी यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री.प्रविण पाटील, मा. पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ श्री.संदीप सिंह गिल्ल, मा.सहा.पोलीस आयुक्त विश्रामबाग विभाग श्री.वसंत कुवर, यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.चंद्रशेखर सावंत, सपोनि बाजीराव नाईक प्रपोनि (गुन्हे) सपोनि सविता सपकाळे, पोउपनि अजित बडे,पोलीस अंमलदार भिवरे, सय्यद, रुपेश वाघमारे, साठे, पवार, मेंगडे, केंगले, वाघ,निकाळजे, शितोळे, धावडे, धडस, तायडे, चलवादी यांनी केली आहे.